भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.४१० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०५/२०१७

**१) नळाचे पाईप फुटल्याचे कारणावरुन संगनमत करुन जिवे मारण्याचे प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०५/२०१७ चे २१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी जाकीर गुलाम रसुल तुरक वय ४२ वर्ष व आरोपी यांच्यात दिनांक २४/०५/२१०७ रोजी नळाचे पाईप फुटल्याचे कारणावरुन शाब्दीक झाले होते त्या कारणावरुन यातील फिर्यादी हा आपले पुतण्यासह आरोपीचे घरासमोरुन जात असता आरोपीतांनी संगनमत करुन आपले घराचे स्लॅपवरुन फिर्यादीला जिवें मारण्याचे उद्देशाने फिर्यादीवर बंदुकीने फायर कले परंतु फिर्यादीला गोळी न लागल्यामुळे बचावला आणि त्याला जखम झाली नाही अशी फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट दिल्यावरुन तसेच मा. जिल्हाधिकारी सा. भंडारा यांचे आदेशान्वये कलम ३७(१)(३) मपोका लागु असुन आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०७,३४ भांदवि. सहकलम ३/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. नागरे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) संगनमत करुन जुन्या वादावरुन अनाधिकृतपणे प्रवेश करुन सामानाची नुकसान करुन विट फेकुन मारल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०५/२०१७ चे २१.०० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन जुन्या वादावरुन फिर्यादीचे अंगनात अनाधिकृतपणे प्रवेश करुन सामानाचे नुकसान करुन फिर्यादीला विट फेकुन मारल्याने फिर्यादी ईमरान अली अहमद अंसारी वय २८ वर्ष, रा. आझाद वार्ड तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. तुमसर येथे कलम ४४८,४२७,३३६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन जहाजावर नौकरी लावण्याचे आमिष दाखवुन पैसे घेवुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/०५/२०१५ ते १८/०८/२०१५ पर्यत यातील आरोपी क्र. १ हा फिर्यादीचा मित्र आहे. त्याने फिर्यादीची आरोपी क्र. २ सोबत ओळख करुन दिली त्यानंतर आरोपी क्र. १ व २ याने संगनमत करुन जहाजावर नौकरी लावण्याचे आमिष दाखवुन फिर्यादी कडुन टप्या टप्याने एकुण ३,८०,०००/–रु. घेतले परंतु नौकरी लावुन न देता फिर्यादीची फसवणुक केल्याने फिर्यादी अमित रेवचंद वालदे वय २४ वर्ष, रा. मुरमाडी/लाखनी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखनी येथे कलम ४२०,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

४) नौकरी लावण्याचे आमिष दाखवुन पैसे घेवुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०४/१०/२०१४ ते २६/०५/२०१७ पर्यत यातील आरोपीने फिर्यादीचे मुलीला अनुकंपा मध्ये तसेच शेजारील रामचंद्र भुरले रा. दहेगाव यांना प्रकल्प गस्तामध्ये सरकारी नौकरी लावण्याचे आमिष देवुन फिर्यादी कडुन ९,०४,०००/–रु. व भुरले यांचेकडुन ७,५०,०००/–रु. घेवुन नौकरी न लावुन देता व पैसे परत न करता फसवणुक केल्याने फिर्यादी श्रीमती लता अरुण चौधरी वय ५३ वर्ष, रा. दहेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. मोहाडी येथे कलम ४२० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) संगनमत करुन बाबा असल्याचे सांगुन जादु टोणाचे कारणावरुन लोकांच्या प्रश्नाची खोटी उत्तरे देवुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २५/०५/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस व त्याचे सोबतचे लोकाना आम्ही बाबा आहोत आमचे कडे शक्ती संचारलेली आहे. आमची पुजा अर्चना केल्याने आपले रोग बरे होतील असे सांगुन दोन्ही आरोपीतांनी पुजा अर्चना करुन आरोपी क्र. २ ने पुजा अर्चनाचे साहित्य व दारु पुजे करीता समोर ठेवुन आसनापन्न होवुन दारु पिवुन फिर्यादी व त्याचे सोबतचे लोकांचे प्रश्नांना खोटी उत्तरे देवुन फिर्यादी व सोबतचे लोकांची फसवणुक केल्याने फिर्यादी कार्तीक वामन बिंदेवार वय २८ वर्ष, रा. कचरखेडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम २(१)(ख),३,५ जादु. टोणा प्रतिबंधक कायदा सहकलम ६५ ई मदाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गायकवाड पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे

६) गैरकायदयाची मंडळी जमवुन चोर समजुन लाथाबुक्यानी मारपीट करुन गाडीला दगड व काठया मारुन गाडीची नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २५/०५/२०१७ चे २१.१५ वा. दरम्यान यातील अनोळखी ४० ते ५० आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी व त्याचा सोबती हे गोंडउमरी वरुन पेट्रोलपंप येथे जाण्याकरीता महालगाव येथे जात असता अनोळखी आरोपीतांनी फिर्यादीची गाडी थांबवुन त्यांना एकावरएक प्रश्न विचारले असता फिर्यादी वत्याचे सोबती हे भांबावुन गेल्याने प्रश्नाची उत्तरे न दिल्याने फिर्यादी व त्याचे सोबती चोर समजुन अनोळखी आरोपीतांनी त्यांना लाथाबुक्यांनी मारपीट करुन किरकोळ जखमी करुन तसेच गाडीला दगड वकाठयाने मारुन गाडीची नुकसान केल्याने फिर्यादी अजय हरीभाऊ वाघमारे वय ४३ वर्ष, रा. पेट्रोलपंप ठाणा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १४३,१४७,१४८,३२३,४२७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वर्मा पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**<u>७) सार्वजीक ठिकाणी महिलांचे चारीत्र्यावर संशय घेवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–</u>**

दिनांक २४/०५/२०१७ चे १६.३० वा. दरम्यान यातील सचीन सय्याम रा. बोदरा हा बोदरा फाटयावरील नंदेश्वर बाग मंदीरामध्ये बसला असता यातील आरोपी तिथे आला व सार्वजनीक ठिकाणी मोबाईलमध्ये टेपीग प्रमाणे फिर्यादी व गावचा ३–४ महिलांचे नावे घेवुन तुमचे चारीत्र्य खराब आहे असे म्हणुन त्यांना अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

(पोनि डी.डी. भोयर)
नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र ९४२३४१८१४२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.